सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२६/1245
दिनांक 13 MAY 2026

प्रति,
**प्राचार्य,**
सर्व तांत्रिक पदविका ,पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय : डीबीटी पोर्टलवर डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत लाभासाठी, संस्थेच्या ठिकाणानुसार, योजनेच्या लाभाची निवड करण्याबाबत ....**

**संदर्भ :** १. शा.निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३/१०/२०१६
२. शा.निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७
३. शा.निर्णय,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, .पनियो-२०२२/प्र.क्र.१८६/तांशि-४ दिनांक०५.०१.२०२४
४. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र
क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/२३५ दिनांक ३०/०४/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन, सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,मंत्रालय,मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविलेल्या महाडीबीटी (संकेतस्थळ- https://mahadbt.maharashtra.gov.in) पोर्टलव्दारे तंत्रशिक्षण संचालनालयाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाची डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना ऑनलाईनरित्या राबविण्यात येते.

शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासकीय,शासन अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतनामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे अल्प-भुधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा संदर्भ क्र.१ चा शासन निर्णय क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३/१०/२०१६ मधील परिच्छेद ७ अन्वये राज्यातील महानगरातील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद,नागपूर) प्रवेशित आहेत,त्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष ३०,०००/- व राज्यातील अन्य ठिकाणी असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रुपये २०,०००/-इतका वसतिगृह भत्ता शै.वर्ष २०२२-२३ पर्यंत देण्यात येत होता.

उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयानुसार डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून खाली तक्त्यामध्ये दिल्याप्रमाणे सुधारित दराने योजनेचा लाभ/भत्ता लागू करण्यात आलेला आहे.

| शै.वर्षातील दहा महिना करिता-एकूण लाभाची रक्कम (रुपयांत) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | भत्ता | मुंबई शहर,मुंबई उपनगर, नवी मुंबई,ठाणे,पुणे,पिंपरी चिंचवड,नागपूर या शहरात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | तालुका ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. |
| | | Benefit Type १ | Benefit Type २ | Benefit Type ३ | Benefit Type ४ |
| १ | भोजन भत्ता | ३२,०००/- | २८,०००/- | २५,०००/- | २३,०००/- |
| २ | निवास भत्ता | २०,०००/- | १५,०००/- | १२,०००/- | १०,०००/- |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,०००/- | ८,०००/- | ६,०००/- | ५,०००/- |
| | **एकूण रक्कम** | **६०,०००/-** | **५१,०००/-** | **४३,०००/-** | **३८,०००/-** |

तरी याबाबत कळविण्यात येते की, सदर योजनेचा सुधारित दरानुसार विद्यार्थ्यांना लाभ प्राप्त करुन देण्यासाठी संस्थांना डीबीटी पोर्टलच्या प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये " Add/Update Maintenance Type" टॅब अंतर्गत Benefit Type निवड करण्याचा पर्याय शै.वर्ष २०२५-२६ साठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सोबत याबाबतचा स्क्रीन शॉट जोडला आहे. प्रपत्र -१

संस्थेच्या प्राचार्याकडून निवड केलेल्या Benefit Type (Benefit Type-१, Benefit Type-२, Benefit Type-३, Benefit Type-४) नुसार योजनेच्या लाभाची रक्कम डीबीटी पोर्टलव्दारे अदा करण्यात येते.

तरी सर्व संस्थांच्या प्राचार्यांना डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांतर्गत विद्यार्थ्यांना लाभाच्या प्राप्तीसाठी खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. संस्थेच्या प्राचार्यांनी त्यांच्या लॉगीनव्दारे "Add/Update Maintenance Type" टॅब अंतर्गत Benefit Type हा संदर्भिय शासन निर्णय ३ नुसार संस्थेच्या ठिकाणानुसार लागू असलेल्या Benefit Type ची निवड करावी.

२. संस्थेच्या ठिकाणानुसार,संस्थेकडून लागू असलेल्या रकमेचा (Benefit Type) पर्याय न निवडता, जास्त रकमेचा (Benefit Type) पर्यायाची निवड करुन अर्ज मंजूर करण्यात आले तर विद्यार्थ्यांना मंजूर झालेली सदरची जास्त रक्कम संस्थेकडून वसूल करण्यात येईल, याची संस्थेच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

३. जर संस्थेकडून चुकीचा पर्यायाची निवड केली असल्यास आणि विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर केले असल्यास असे सर्व अर्ज संस्थांनी विभागीय कार्यालयाकडून संस्था लॉगीनमध्ये परत घेऊन संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीनव्दारे लागू असलेल्या रकमेचा (Benefit Type) पर्याय दुरुस्त करुन अर्ज मंजूर करण्यात यावे.

४. डीबीटी पोर्टलच्या कार्यपध्दतीनुसार, संस्थेकडून मंजूर झालेल्या अर्जांपैकी जर एकाही अर्जाचे देयक जनरेट झाले असेल तर लागू असलेल्या रकमेचा (Benefit Type) पर्याय दुरुस्त करता येणार नाही. जर संस्थेकडून चुकीचा पर्याय निवडल्या कारणाने विद्यार्थ्यांना पहिल्या हप्त्याची जास्त रक्कम मंजूर झाली असल्यास, अशा संस्थांनी विद्यार्थ्यांचा दुसरा हप्ता मंजूर करु नये.

**सहपत्र** : संदर्भिय पत्र

**(डॉ.वि.रं.मानकर)**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल-desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

**कालमर्यादीत : स्पीडपोस्ट /ई-मेलद्वारे**

जा. क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/२३५
दिनांक :- ३० /०४/२०२६

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

**विषय : डीबीटी पोर्टलवर डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांतर्गत लाभासाठी, संस्थेने संस्थेच्या ठिकाणानुसार, योजनेच्या लाभाची निवड करण्याबाबत......**

संदर्भ :१. शा.निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३/१०/२०१६
२. शा.निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७
३. शा.निर्णय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. पनियो-२०२२/प्र.क्र.१८६/तांशि-४, दि.०५/०१/२०२४

सन २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांकरिता बनविलेल्या महाडीबीटी (संकेतस्थळ-https://mahadbt.maharashtra.gov.in) पोर्टलद्वारे तंत्रशिक्षण संचालनालयाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाची **डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना** ऑनलाईनरित्या राबविण्यात येते.

शासनाने निर्धारित केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना शासकीय, शासन अनुदानित व विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये/ तंत्रनिकेतनामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांचे पालक सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे अल्प-भुधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा संदर्भ क्र. १ चा शासन निर्णय क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र. ५०१/तांशि-४, दि. १३/१०/२०१६ मधील परिच्छेद ७ अन्वये राज्यातील महानगरातील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) प्रवेशित आहेत, त्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष ३०,०००/- व राज्यातील अन्य ठिकाणी असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्ष रुपये २०,०००/- इतका वसतिगृह भत्ता **शै. वर्ष २०२२-२३ पर्यंत** देण्यात येत होता.

उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयानुसार डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांतर्गत विद्यार्थ्यांना **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून** खाली तक्त्यामध्ये दिल्याप्रमाणे **सुधारित दराने** योजनेचा लाभ/भत्ता लागू करण्यात आलेला आहे.

| शै.वर्षातील दहा महिना करिता- एकूण लाभाची रक्कम ( रुपयांत ) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | भत्ता | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या शहरांत उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर महसुली विभागीय शहरांतील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर जिल्हयांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | तालुका ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. |
| | | **Benefit Type 1** | **Benefit Type 2** | **Benefit Type 3** | **Benefit Type 4** |
| १. | भोजन भत्ता | ३२,०००/- | २८,०००/- | २५,०००/- | २३,०००/- |
| २. | निवास भत्ता | २०,०००/- | १५,०००/- | १२,०००/- | १०,०००/- |
| ३. | निर्वाह भत्ता | ८,०००/- | ८,०००/- | ६,०००/- | ५,०००/- |
| | एकूण रक्कम | ६०,०००/- | ५१,०००/- | ४३,०००/- | ३८,०००/- |

तरी याबाबत कळविण्यात येते की, सदर योजनेचा सुधारित दरानुसार विद्यार्थ्यांना लाभ प्राप्त करुन देण्यासाठी संस्थांना डीबीटी पोर्टलच्या प्राचार्यांच्या लॉगीनमध्ये "Add/Update Maintenance Type" टॅब अंतर्गत Benefit Type निवड करण्याचा पर्याय शै.वर्ष २०२५-२६ साठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.. सोबत याबाबतचा स्क्रीन शॉट जोडला आहे. **प्रपत्र-१**

संस्थेच्या प्राचार्याकडून निवड केलेल्या Benefit Type (Benefit Type १, Benefit Type २, Benefit Type ३, Benefit Type ४) नुसार योजनेच्या लाभाची रक्कम डीबीटी पोर्टलद्वारे अदा करण्यात येते.

तरी, सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या अखत्यारित येत असलेल्या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांतर्गत विद्यार्थ्यांना लाभाच्या प्राप्तीसाठी खालीलप्रमाणे सूचित करण्यात यावे.

१. संस्थेच्या प्राचार्यांनी त्यांच्या लॉगीनद्वारे "Add/Update Maintenance Type" टॅब अंतर्गत Benefit Type हा संदर्भीय शासन निर्णय ३ नुसार संस्थेच्या ठिकाणानुसार लागू असलेल्या Benefit Type ची निवड करावी.

२. संस्थेच्या ठिकाणानुसार, संस्थेकडून लागू असलेल्या रकमेचा ( Benefit Type ) पर्याय न निवडता, जास्त रकमेचा ( Benefit Type ) पर्यायाची निवड करुन अर्ज मंजूर करण्यात आले **तर विद्यार्थ्यांना मंजूर झालेली सदरची जास्त रक्कम संस्थेकडून वसूल करण्यात येईल,** याबाबत संस्थेच्या प्राचार्यांना स्पष्ट सूचित करण्यात यावे.

३. जर संस्थेकडून चुकीचा पर्यायाची निवड केली असल्यास आणि विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर केले असल्यास असे सर्व अर्ज संस्थांनी विभागीय कार्यालयाकडून संस्था लॉगीनमध्ये परत घेऊन संस्थेच्या प्राचार्यांच्या लॉगीनद्वारे लागू असलेल्या रकमेचा ( Benefit Type ) पर्याय दुरुस्त करुन अर्ज मंजूर करण्यात यावे.

४. डीबीटी पोर्टलच्या कार्यपध्दतीनुसार, संस्थेकडून मंजूर झालेल्या अर्जांपैकी जर एकाही अर्जाचे देयक जनरेट झाले असेल तर लागू असलेल्या रकमेचा ( Benefit Type ) पर्याय दुरुस्त करता येणार नाही. जर संस्थेकडून चुकीचा पर्याय निवडल्या कारणाने विद्यार्थ्यांना पहिल्या हप्त्याची जास्त रक्कम मंजूर झाली असल्यास, अशा संस्थांनी विद्यार्थ्यांचा दुसरा हप्ता मंजूर करु नये.

**विभागीय कार्यालयांना सूचना -**

तसेच, विभागीय कार्यालयांनी देखील डीबीटी पोर्टलवर विभागीय कार्यालयाच्या लॉगीन आयडीमध्ये उपरोक्त योजनांचे पुढील कार्यवाहीसाठी प्राप्त होत असलेले, संस्थास्तरांवर मंजूर झालेले अर्ज (Pending at Department अंतर्गत) तपासणी दरम्यान, खालील बाबी तपासाव्यात.

१. अर्ज मंजूर करताना, संस्थेकडून संस्थेच्या ठिकाणानुसार डीबीटी पोर्टलवर योजनेच्या लाभासाठी निवड करण्यात आलेला पर्याय (Benefit Type) तपासावा.

२. योजनेच्या लाभासाठी संस्थेकडून चुकीचा (Benefit Type ) पर्याय निवडला गेला असल्यास संस्थेचे अर्ज मंजूर न करता निवडलेला पर्याय दुरुस्त करण्यासाठी संस्थेला परत पाठविण्यात यावेत व संबंधित संस्थेला, सदर योजनेचे विद्यार्थ्यांचे अर्ज संस्था लॉगीनमध्ये परत पाठविल्याबाबत कळवून, डीबीटी पोर्टलवर योजनेच्या लाभासाठी संस्थेकडून निवड करण्यात आलेला चुकीचा Benefit Type ,संस्था स्तरांवरुन "Add/Update Maintenance Type" टॅब अंतर्गत देण्यात आलेला Benefit Type संस्थेच्या ठिकाणानुसार दुरुस्त करण्याबाबत कळविण्यात यावे. व तद्नंतर अर्ज मंजूर करण्याबाबत कळविण्यात यावे.

(डॉ. विनोद म. मोहितकर.)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रपत्र-९

MahaIT Workflow

dbtworkflow.mahaonline.gov.in/InstituteType/InstituteType

- Reports
  - DBT Dashboard
  - Allotment Date Wise Report
  - Institute Disbursement Report
  - Student Disbursement Report
  - Benefit Component Report
  - Status wise Application Detail
- Institute
  - Deactive Duplicate Aadhaar Profile
  - Fee Correction Request
  - Reset Mobile Number
  - Update Bank Account
  - Payment Failed Utility
- Grievance/Support
  - Grievance/Suggestions
  - Grievances Dashboard
  - Support Desk
- Reset Password
- Add / Update Maintenance Type

- The Institute shall select the appropriate maintenance allowance benefit type based on its location and in accordance with the Government Resolution (GR).
- Once the maintenance type selected, it cannot be changed later. Disbursement will be carried out strictly according to the selected type. The entire responsibility for selecting the appropriate maintenance type rests with the Principal or Head of the Institute.
- The benefit amount, with respect to the institute's location and for a maximum duration of 10 months, is as follows:

| Sr. No. | Allowance | Students pursuing higher education in cities including Mumbai city, Mumbai suburbs, Navi Mumbai, Thane, Pune, Pimpri Chinchwad and Nagpur (Benefit Type 1) | Students pursuing higher education in other revenue divisional cities and remaining C class municipal areas (Benefit Type 2) | Students pursuing higher education in other districts (Benefit Type 3) | Students pursuing higher education in Talukas (Benefit Type 4) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Food Allowance | 32,000 | 28,000 | 25,000 | 23,000 |
| 2 | Residence Allowance | 20,000 | 15,000 | 12,000 | 10,000 |
| 3 | Subsistence Allowance | 8,000 | 8,000 | 6,000 | 5,000 |
| Total Amount | | 60,000 | 51,000 | 43,000 | 38,000 |

**Financial Year** Select Financial Year

**Institute Maintenance Type** Select Institute Maintenance T...

☐ You are solely responsible for understanding the eligibility criteria and implications of each benefit type under the Dr. Panjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Scheme. It is strongly advised to thoroughly review the scheme guidelines and confirm your institute's eligibility before making your final selection.

Save

Show 10 entries

Search

ENG US 17:43 10-04-2026